महात्मा ज्योतिबा फुले विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था व इतर ७ संस्थांमध्ये सतत व समवर्ती लेखापरिक्षण योजना राबविण्यासाठी निर्माण केलेली अस्थायी पदे दि. ०१/०३/२०२६ ते दि. ३१/०८/२०२६ पर्यंत चालू ठेवण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
शासन निर्णय क्रमांकः अस्थायी- ०२२६/प्र.क्र. ६० /१८-स,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक- ११.०३.२०२६

<u>वाचा:-</u>
1) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र राजस १००८/प्र.क्र.५३८/५-स, दि. ०५.०५.२०११.
2) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे कार्यालय यांचे पत्र क्र. जा.क्र. कक्ष-१/आस्था/मज्योफुले/मुदतवाढ/२०२६/३४६ , दि. २३/०२/२०२६.
3) शासन निर्णय, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, क्र. अस्थायी- ०१२५/प्र.क्र.२७/१८-स, दि. १०/०९/२०२५.
4) शासन निर्णय, वित्त विभाग, पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क. दि. २८ /०२/२०२६.

<u>प्रस्तावना :-</u>

संदर्भाधीन शासन निर्णय क्र. १ अन्वये सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागातील स्थायी/ अस्थायी पदांच्या आढाव्यानुसार सहकार विभागाचा सुधारीत आकृतीबंध निश्चित करण्यात आला असून सदर आकृतीबंधामध्ये प्रस्तुत ०२ पदांचा समावेश आहे. उपरोक्त संदर्भ क्र. ३ अन्वये महात्मा ज्योतिबा फुले विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था व इतर ७ संस्थांच्या सतत व समवर्ती लेखापरीक्षण योजना राबविणेबाबत लेखापरिक्षणासाठी निर्माण करण्यात आलेल्या ०२ अस्थायी पदांना दि. २८.०२.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास शासनाने मंजूरी दिलेली होती. सदर ०२ अस्थायी पदांची मुदतवाढ दि. २८.०२.२०२६ रोजी संपुष्टात आली असल्याने व ९७ व्या घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने लेखापरीक्षण विभागास आवश्यकतेनुसार काम करण्यासाठी पदे पुढे सन २०२६-२७ या कालावधीकरीता दि. ०१.०३.२०२६ ते दि. २८.०२.२०२७ पर्यंत चालू ठेवण्याबाबतचा प्रस्ताव सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे या कार्यालयाने वाचा क्र. २ अन्वये शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावास अनुसरुन या ०२ पदांना पुढे दि. ०१.०३.२०२६ ते दि. ३१.०८.२०२६ पर्यंत मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय :</u>

सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या उपरोक्त वाचा क्र. २ मधील प्रस्तावानुसार महात्मा ज्योतिबा फुले विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था व इतर ७ संस्थांच्या सतत व समवर्ती लेखापरीक्षण योजना राबविणेबाबत लेखापरिक्षणासाठी निर्माण केलेल्या खालील अस्थायी पदांना दि. ०१.०३.२०२६ ते दि. ३१.०८.२०२६ पर्यंत पुढे चालू ठेवण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | पदसंख्या |
|---|---|---|---|
| १ | उपलेखापरिक्षक | एस ८- २५५००-८११०० | ०१ |
| २ | कनिष्ठ लिपिक | एस ६- १९९००-६३२०० | ०१ |
| एकूण पदे | | | ०२ |

वरील एकूण ०२ अस्थायी पदांचा होणारा खर्च हा सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मागणी क्र. व्ही-२ मधील अर्थसंकल्पीय लेखाशीर्ष “२४२५- सहकार, १०१- सहकारी संस्थांचे लेखापरिक्षण, १०१- (एक) (ए) लेखापरिक्षणासाठी कर्मचारी वर्ग (२४२५ ०२२७)” या लेखाशीर्षाखाली सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी केलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा. परंतू ही अस्थायी पदे विहीत पध्दतीने भरली आहेत या अटीच्या अधीन राहून ही मंजूरी देण्यात येत आहे.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र. पदनि २०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दि. २८.०२.२०२६ अन्वये संबंधित प्रशासकीय विभागांना प्रदान केलेल्या मुदतवाढीच्या अधिकारांतर्गत निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३१११२४१४५९८०२ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TEJAL RAMESHRAO PARDE

Digitally signed by TEJAL RAMESHRAO PARDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=CO-OPERATION MARKETING AND TEXTILE DEPARTMENT, 2.5.4.20=019d779a48258636496c1fec0492fd7daa52f3f2c329798028660b47fed6130a, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=89128237A4F41B9735DD61762BBCE33E4A0AF82C2F7EAB2825CB61E62611D4AB, cn=TEJAL RAMESHRAO PARDE
Date: 2026.03.11 12:45:54 +05'30'

**(तेजल र. पारडे)**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. महालेखापाल-१, महाराष्ट्र (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) मुंबई.
२. महालेखापाल-२, महाराष्ट्र (लेखापरिक्षा / लेखा व अनुज्ञेयता) नागपूर.
३. वित्त विभाग (वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई.
४. वित्त विभाग (व्यय-२),/अर्थसं-१२,/अर्थसं-१९, /व्यय-१४, मंत्रालय, मुंबई.
५. कार्यासन अधिकारी, ५-स /१२-स,/१७-स, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय. मुंबई.
६. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, (सर्व)
८. विभागीय विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था (सर्व)
९. सहनिबंधक, सहकारी संस्था, (लेखापरिक्षण) सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती).
१०. जिल्हा विशेष लेखापरिक्षक, सहकारी संस्था(पुणे,ठाणे,नाशिक,धुळे,यवतमाळ,नागपूर, चंद्रपूर)
११. जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, (पुणे,ठाणे,नाशिक,धुळे,यवतमाळ,नागपूर, चंद्रपूर)
१२. जिल्हा कोषागार अधिकारी, (पुणे,ठाणे,नाशिक,धुळे,यवतमाळ,नागपूर, चंद्रपूर)
१३. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१४. निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई
१५. निवड नस्ती.